नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३२६ Issue - 326 | वार सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ Blow- Monday Date 14 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज देणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ; पुढील पाच वर्षात राज्यात दरवर्षी वीज बीलाची रक्कम कमी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वर्धा : डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच येत्या पाच वर्षात राज्यात साम ान्य नागरिकांचे वीज बील दरवर्षी कमी होणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आर्वी येथे विविध विकास कामांच्या लोकार्पण व भूमिपूजन प्रसंगी केले. तसेच वर्धा जिल्ह्यात लोअर वर्धा प्रकल्प, वाढोणा-पिंपळखुटा आदी सिंचन प्रकल्पांद्वारे शेतीसाठी पाणी व वीज उपलब्ध करून देऊ आणि जिल्ह्यातून जाणा-या समृध्दी महामार्गावरील नोडवर एमआयडीसी उभारुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर्वी येथील नवीन प्रशासकीय इम ारतीच्या लोकार्पणासह ७२० कोटींच्या विकास कामांचे ई-लोकार्पण व भूमि पूजन झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे, आम दार सर्वश्री दादाराव केचे, सुमीत वान-खेडे, समीर कुणावर, राजेश बकाने,माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिता-चे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंम लबजावणी सुरु केली आहे. शेतीसाठी १२ तास विजेची शेतक-यांची मागणी होती. यादृष्टीने राज्य शासनाने प्रभावी अंमलबजावणी सुरु केली असून डिसेंबर २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसाला १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन दिली जाणार आहे. राज्य शासनाने २०२५ ते २०३० पर्यंत राज्यातील वीज वापरकर्त्यांचे वीज बील दरवर्षी कमी करण्याचे नियोजन व तशी कार्यवाही सुरु केली आहे. तसेच ३०० युनीट पर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यम वर्गीय व गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.



वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघात विविध महत्वाच्या विकास कामांचे लोकार्पण झाले आहे. याद्वारे या भागातील विकासाला चालना मिळेल. तसेच येत्या काळात या भागातील लोअर वर्धा प्रकल्प आणि वाढोणा -पिंपळखुटा उपसा सिंचन प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल. या सिंचन प्रकल्पांद्वारे या भागा-तील शेतीला मुबलक पाण्यासोबत मोफत वीज उलब्ध होणार आहे. लोअर वर्धा प्रकल्पावर ५०० मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे. तसेच वाढोणा-पिंपळखुटा उपसा सिंचन योजनेला मान्यता देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यात समृद्धी महामार्गामुळे विकासाला गती आली आहे. तसेच येत्या काळात वर्ध्यातून सुरु होणाऱ्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग आणि सिंदी येथील ड्रायपोर्टमुळे जिल्हा म ध्यभारताचे लॉजिस्टीक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. या जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील विरुळ नोडला राज्य शासनाकडून लवकरच म ान्यता देऊन येथे एमआयडीसी उभारली जाणार आहे. या माध्यमातून उद्योगासाठी इको सिस्टीम तयार होऊन स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रासाठी १६.५ लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले असून यातील ७ लाख कोटींचे करार विदर्भासाठी करण्यात आले आहे. वर्ध्यासह विदर्भातील अन्य जिल्ह्यांमध्येही या माध्यमातून मोठी गुंतवणूक येणार आहे. गडचिरोली जिल्हा स्टील कॅपीटल म्हणून नावारुपास येत आहे. येत्या काळात वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये लोहखनीजावर आधारीत उद्योग उभारणीसाठी राज्य शासनाने विशेष सवलत दिली असून या भागात मोठ्याप्रमाणात गुंतवणूकीचे प्रस्ताव शासनाकडे आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाम ुळे वर्ध्यासह विदर्भातील दहा जिल्ह्याम धील काही दुष्काळग्रस्त भाग सुजलाम सुफलाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पाद्वारे गोसीख-ुर्द धरणातील ६२ टीएमसी सांडव्याद्वारे नव्याने ५५० कि.मी.ची नदी तयार करण्यात येणार आहे. यासाठी १ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठीच्या सर्व मंजुरी देण्यात आल्या असून योजनेचा अंतिम आराखडा तयार होत आहे. यावर्षा अखेरी किंवा पुढील वर्षाच्या सुरव-ातीला या योजनेचे काम सुरु होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**वर्धा जिल्ह्यासाठी ऐतिहासिक क्षण – पालकमंत्री डॉ. पंकज भोयर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर्वी मतदार संघातील तीन तालुक्यांमधील ७२० कोटींच्या विविध ११ विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन झाले. या माध्यमातून वर्धा जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचे, पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांनी सांगितले. राज्यातील ४७६ सरकारी शाळा या आदर्श शाळा बनविण्यात येत असून पहिल्या टप्प्यातील आदर्श शाळेचा शुभारंभ १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या औचित्याने सुरु होणार असल्याचे सांगून शिक्षण क्षेत्रात या उपक्रमाद्वारे सकारात्म क बदल होणार असल्याचे ते म्हणा-ले. आर्वी विधानसभा क्षेत्रातील तीन शाळांचा यात समावेश असल्याचेही ते म्हणाले. करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

खासदार अमर काळे, आमदार सुमित वानखेडे, आमदार दाद-ाराव केचे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी प्रास्ताविक केले तर आर्वी उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी आभार मानले.

# दहा लाख कोटींचे रस्ते, महामार्ग; येत्या दोन वर्षांसाठी नितीन गडकरींचा महत्त्वाकांक्षी संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : 'देशा-तील रस्ते आणि महामार्गांचे जाळे मजबूत करण्यावर केंद्र सरकारचा भर असून, पुढील दोन वर्षांत त्यासाठी १० लाख कोटी रुपये गुंतवण्याची योजना आखण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने अमेरिकेला टक्कर देतील अशा रस्त्यांची ईशान्य भारतात निर्मिती करण्यावर भर असेल', असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी सांगितले.

'देशातील पायाभूत सुविधांमध्ये पुढील दोन वर्षांत आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने ठेवले आहे. देशातील महामार्गांच्या सक्षमीकरणासाठी पुढील दोन वर्षांत १० लाख कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेण्याची आमची योजना आहे. त्यात प्रामुख्याने ईशान्येकडील आणि सीमावर्ती भागांतील पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर दिला जाईल. ईशान्येकडील रस्ते कठीण भूप्रदेशांतील आणि सीमांच्या जवळ असल्याने तेथे सुविधांमध्ये तातडीने वाढ करण्याची गरज आहे', असे गडकरी म्हणाले. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक, राजस्थान आणि दिल्लीसह सर्व राज्यांमध्ये त्यासाठी काम सुरू आहे, असे त्यांनी नमूद केले.

'ईशान्येकडील राज्यांमध्ये २१,३५५ किमी लांबीचे आणि ३,७३,४८४ कोटी रुपये खर्चाचे ७८४ महामार्ग प्रकल्प राबविले जाणार आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ लिमिटेड यांच्या माध्यमातून हे प्रकल्प राबवले जात आहेत, असे गडकरी म्हणा-ले. 'सध्या आसाम ५७,६९६ कोटी रुपयांचे, तर बिहारमध्ये सुमारे ९०,००० कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. पश्चिम बंगालमध्ये ४२,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त, झारखंडमध्ये सुमारे ५३,००० कोटी रुपये आणि ओडिशामध्ये सुमारे ५८,००० कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेत आहोत', अशी माहिती गडकरी यांनी दिली. आसाम वगळता ईशान्येकडील राज्यात यावर्षी सुमारे १ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेत आहोत, अशी पुस्ती त्यांनी जोडली. तसेच नागपूरमध्ये १७० कोटी रुपये खर्चून 'मास रॅपिड ट्रान्सपोर्ट'चा प्रायोगिक प्रकल्प सुरू असल्याचे गडकरी म्हणाले. राष्ट्रीय महामार्ग उभारणीच्या वेगात लक्षणीय वाढ झाली आहे. मार्च २०१४मध्ये ९१,२८७ किमी असलेले हे जाळे आता १,४६,२०४ किमीपर्यंत पोहोचले आहे. २०२४-२५मध्ये ५,६१४ किमी राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात आल्याची माहितीही गडकरी यांनी दिली.

# राज्यात अवकाळी पावसाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : गेल्या काही दिवसांपासून राज्यात हवाम ानात सातत्याने बदल होताना दिसतोय. कधी पाऊस तर कधी उन्हाच्या झळा या अधिक तीव्र होताना दिसत आहेत. होळीनंतर वातावरण बदलले आहे. म ार्च महिन्यातच वारा चढताना दिसला.


एप्रिलमध्ये उन्ह अधिक तीव्र होण्याचे संकेत होते. मात्र, राज्यातील अनेक भागांमध्ये अवकाळी पाऊस विजांच्या कडकडाटासह झाला. फळबागा आणि पिकांचे मोठे नुकसान या अवकाळीने झाले. नाशिकमध्ये काही ठिकाणी गारपिट देखील झाली. सतत अवकाळी पाऊस हजेरी लावतोय. आताही हवाम ान खात्याकडून पावसाचा इशारा देण्यात आलाय. राज्यात पा-वसाला पोषक असे वातावरण हे बघायला मिळतंय. चक्राकार वारे वाहत असल्याने कमी दाबाचा पट्टा निर्माण झालाय. जळगा-वात काल मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. वादळी वाऱ्यासह हा पाऊस कोसळला. या अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले. आता भारतीय हवामान खात्याकडून मोठा इशारा हा देण्यात आलाय. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळे आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अलर्ट देण्यात आलाय. यादरम्यान ताशी ३०-४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून मध्य महाराष्ट्रात पाऊस हजेरी लाव-ताना दिसतोय. मुंबई शहर आणि उपनगरात आकाश मुख्यतः निरभ्र राहील. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३४ अंश सेल्सिअस आणि २४ अंश सेल्सिअसच्या आसपास असेल. एकीकडे अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याकडून दिला जातोय तर दुसकीकडे म ात्र, कोकणात उष्णता वाढताना दिसतंय. कोकणात हवामान खात्याकडून उष्णता वाढणार असल्याचे सांगण्यात आले.

# थलापती विजयने वक्फ सुधारणा कायदा २०२५ला दिले आव्हान; सर्वोच्च न्यायालयात याचिका केली दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई -लोकसभा आणि राज्यसभेत बहुमत मिळाल्यानंतर आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या संमतीनंतर, वक्फ दुरुस्ती विधेयक २०२५ मंजूर झाले आणि त्याचे कायद्यात रूपांतर झाले. मात्र, तमिलगा वेत्री कळघम (ढतघ) पक्षाचे अध्यक्ष आणि अभिनेता थलपथी विजय यांना हा कायदा आवडला नाही. अशा परिस्थितीत, अभिनेत्याने या कायद्याला आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे.

तमिलगा वेत्री कझगम (टीव्हीके) पक्षाचा अध्यक्ष आणि अभिनेता थल-ापती विजयने वक्फ (सुधारणा) कायदा २०२५ ला आव्हान दिलं आहे. या कायद्याविरुद्ध अभिनेत्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यापूर्वी, पीटीआयच्या वृत्तानुसार, थल-ापती विजयने एका निवेदनात वक्फ (सुधारणा) कायद्याचं 'म ुस्लिमविरोधी' वर्णन केलं होतं. तो म्हणाला की, 'संसदेच्या कनिष्ठ सभागृहात मंजूर झालेल्या विधेयकाने पुन्हा एकदा संविधानाच्या प्रतिष्ठेवर आणि धर्मनिरपेक्ष भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.'



थलापती विजयने असंही म्हटलं होतं की, 'सर्व लोकशाही शक्तींचा आवाज लक्षात घेऊन लोकशाहीविरोधी विधेयक तात्काळ मागे घ्यावे अशी टीव्हीकेची मागणी आहे. जर भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने असं केलं नाही, तर टीव्हीके मुस्लिम बांधवांच्या वक्फ हक्कांसाठीच्या कायदेशीर लढ्यात त्यांच्यासोबत सामील होईल.'

थलापती विजयच्या आधीही अनेक नेत्यांनी वक्फ (सुधारणा) कायद्याविरुद्ध न्यायालयात धाव घेतली आहे. यामध्ये एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी, काँग्रेसचे खासदार म ोहम्मद जावेद आणि इम्रान प्रतापगढ़ी, आ-पचे आमदार अमानतुल्ला खान आणि आझ-ाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद आणि समाजवादी पक्षाचे खा-सदार झिया उर रहमान बारक यांचा समावेश आहे.

# माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री मनोज शोत्री यांच्या हस्ते आम दार सुधीर मुनगंटीवार यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उप-स्थित आ. समाधान आवताडे, मा.आ. प्रशांत परिचारक, श्रीअर्जुन चव्हाण, यावेळी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते



## संपादकीय....

### आमूलाग्र बदल

देशातील पायाभूत सुविधांमध्ये पुढील दोन वर्षांत आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने ठेवले आहे. देशातील महामार्गांच्या सक्षमीकरणासाठी पुढील दोन वर्षांत १० लाख कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेण्याची आमची योजना आहे. त्यात प्रामुख्याने ईशान्येकडील आणि सीमावर्ती भागांतील पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर दिला जाईल. ईशान्येकडील रस्ते कठीण भूप्रदेशांतील आणि सीमांच्या जवळ असल्याने तेथे सुविधांमध्ये तातडीने वाढ करण्याची गरज आहे', असे गडकरी म्हणाले. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक, राजस्थान आणि दिल्लीसह सर्व राज्यांमध्ये त्यासाठी काम सुरू आहे, असे त्यांनी नमूद केले. 'ईशान्येकडील राज्यांमध्ये २१,३५५ किमी लांबीचे आणि ३,७३,४८४ कोटी रुपये खर्चाचे ७८४ महामार्ग प्रकल्प राबविले जाणार आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ लिमिटेड यांच्या माध्यमातून हे प्रकल्प राबवले जात आहेत.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१८व्या आणि १९व्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी आणि अन्य पाश्चिमात्य राष्ट्र आणि भारतामध्ये ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळी किंवा परिवर्तन झालीत, त्यात वृत्तपत्राचे योगदान मोलाचे आहे. जागतिक, राष्ट्रीय आणि स्थानिक घडामोडी समाजापर्यंत येणारे वृत्तपत्र हे एक प्रमुख साधन होते आणि आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपादकांनी घेतलेली स्वयंदीक्षा म्हणजे पत्रकारिता होय असे म्हटले आहे. वृत्तपत्रे किंवा पत्रकारिता म्हणजे वर्तमानाची व्याख्या करणारी आणि भविष्य घडविणारी एक घटना आहे.

वृत्तपत्रामुळे समाजातील निर्भयता, स्पष्टपणा आणि स्वातंत्र्याचा उदय होतो. मानवी समाज वृत्तपत्रातील घटना, लेख-अग्रलेख वाचून प्रभावित होतो. अर्थातच त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, त्याप्रमाणे संपादकाला स्वयंदीक्षा घ्यावी लागते. कारण संपादकाच्या बौद्धिक, सामाजिक, जागृती आणि जाणीवेवरच हे सगळं अवलंबून असते. वृत्तपत्रांच्या कार्यानुसार आणि पत्रकाराच्या ध्येयानुसार पत्रकारितेला विविध भागात विभागीत करण्यात आले आहे. त्यात 'डव्होकेसी जर्नालिझम' म्हणजे जनसमर्थन पत्रकारिता ही महत्त्वाची पत्रकारिता आहे.

'डव्होकेसी जर्नालिझम' मध्ये पत्रकार एखाद्या विषयावर ठाम भूमिका घेतात आणि त्यांच्या लिखाणाने वाचक किंवा प्रेक्षकांना त्यांचा दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करतात. सामाजिक प्रश्न वा समस्या सोडवणुकीसाठी न्याय मिळवून देईपर्यंत सातत्यपूर्ण केलेली पत्रकारिता म्हणजे 'डव्होकेसी जर्नालिझम' जनसमर्थन पत्रकारिता होय. या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता, भारताला राष्ट्र म्हणून उभे राहायचं असेल, जगायचे असेल, तर सर्वप्रथम भारतातल्या प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी प्राप्त करून द्यावी लागेल. हा ऐतिहासिक महामंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेने जगाला दिलेला आहे. माणूसपणाच्या भोवती असलेली विषबंदी, तिचा त्याग करण्याचा संकल्प प्रत्येक भारतीयांनी करून राष्ट्रभक्ती, राष्ट्रशक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्राच्या ऐक्याचा संकल्प करावा, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच पत्रकारितेचे उद्दिष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचा दृष्टिकोन स्वीकारून तत्कालीन स्पृश्य-अस्पृश्य समाज, राजकीय नेते, त्यांचे राजकीय विचार प्रवाह आणि ब्रिटिश सरकार यांच्या परस्पर वैचारिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, द्वन्दाची अधिक सटीक पद्धतीने मांडणी करून समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वलिखित अग्रलेखातील विविध पैलू हे समकालीन इतर पत्रकारांच्या पेक्षा भिन्न आहेत. त्यांची दृष्टी, विषय मांडणी, दूरदृष्टीची परिणामकारकता भेदक आणि मार्मिक आहे. त्यांचे लेखन बहुआयामी बहुविषयी स्पर्शित आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जनसमर्थन पत्रकारितेने माणूस घडविण्याच्या आणि एक नवीन भारत निर्मितीच्या महान क्रांतिकारी कार्यात अमूल्य योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता १९२० ला त्यांनी 'मूकनायक' द्वारे मुक्यांना बोलके केले, तर 'बहिष्कृत भारत' ने बहिष्कृत समाजाला प्रबोधित करून अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी तयार केले. याच बहिष्कृत भारतातील जनतेला त्यांच्या 'जनता' ने अधिकारांची आणि न्याय हक्काची जाणीव करून दिली. या देशातील मुक असलेल्या माणसाची प्रगती अशा पद्धतीने करत, माणसाला प्रबुद्ध नागरिक आणि देशाला प्रबुद्ध भारत बनविण्याचे महान कार्य 'प्रबुद्ध भारता'तून त्यांनी केले आहे. त्यामुळेच एक नवा इतिहास घडला. असे कार्य त्यांच्या जनसमर्थन पत्रकारितेमुळे घडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे उद्दिष्ट समाज परिवर्तन, समाज सुधारणा करणे, हे असल्यामुळे त्यांनी लोकप्रबोधन आणि लोक शिक्षण, सामाजिक जाणिवेच्या अनुषंगाने आपल्या अग्रलेखांचे लेखन केले आहे. त्या विषयाच्या मांडणीमध्ये त्यांचे सामाजिक परिवर्तन हेच ध्येय आहे. एकूण समग्र परिवर्तन आणि मानवी कल्याणाचे ध्येय हस्तगत करण्यासाठीच त्यांनी अग्रलेखाचे लेखन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला एकसंघ ठेवण्यासाठी महान राज्यघटना देऊन, एक स्वयंपूर्ण लोकशाही लोकराज्य म्हणून निर्माण केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते जनसंपर्क पत्रकारितेचे जनक ठरतात.

**लेखक:- पत्रकार गौतम धोंडीराम बाळशंकर ग्रामपंचायत सदस्य हन्नूर सर्वस्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकाचे लेखक**

# चला भिमजयंती साजरी करू, भिमाचे विचार समाजात पेरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**करावे गुलामास जागे धरुनी दंड**
**उठेल करावया तोच भारती बंड**
**भिमाने हेच केले गाजविले नऊ खंड**
**प्रचंड भुवरती पेटवीले रणकुंड**
**चारी वर्णाचे जाळूनी तोंड**
**उभ्या विश्वात काढली त्यांची पुरी धिंड**
**कराया सुखी सारा आपला भारत खंड**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती हि जगभरात मोठ्या थाटामटात व आनंदात साजरी होती. अति विशेष म्हणजे एखाद्या महापुरुषांची जयंती जनसामान्य मानसांकडून मोठ्या थाटामाटात आदरात साजरी होणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एकमेव महापुरुष आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर एकच नव्हे अनेक जागतिक नोंदी आहेत ज्या बघून प्रत्येक मानसाची मान सन्मानाने उंचावेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य व विचार यावर अनेक संशोधकांनी संशोधन केले आहे. एवढे महान कार्य व विचार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला दिले आहेत. आणि हे महान कार्य व विचार एका भाषणात किंवा एका पुस्तकात बंदिस्त होऊच शकत नाही. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारिक मानवंदना देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल समाजात जागृती निर्माण होण्यासाठी हा लेख लिहण्याचा प्रयत्न करत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेताना आपल्याला डोक्यातून जात बाहेर काढावी लागेल तेव्हाच आपल्याला खरे बाबासाहेब समजतील. जागतिक किर्तीचे डॉ बाबासाहेब आंबेडकर समजण्यासाठी आपल्याला आपली बुद्धीमत्ता सुद्धां जाती धर्मापलिकडे जाऊन माणूस म्हणून माणसला बघण्याची असायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे महार जातीत जन्माला आले म्हणून ते फक्त महारांचे उद्धारक आहेत असे मुळीच नाही. खरं तर डॉ बाबासाहेब आंबेडकर हे समस्त मानसाचे उद्धारक आहेत. भारताचा इतिहास बघितला तर विषमतेने, अंधविश्वास, पाखंड, थोतांडच्या नावाखाली एकाच वर्गाच्या वर्चस्वाचे मानसाला गुलाम बनवणाऱ्या विकृत विचार व संस्काराने माखलेला होता. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही एका वर्गाची व विशेषत: जे स्वतःला श्रेष्ठ व बुद्धिमान समजतात त्या वर्गाने इतरांना अज्ञान, ठेवून त्यांच्या मध्ये अंधविश्वास, थोतांड पसरवून लोकांच्या अज्ञानावर स्वतः ची झोळी भरून घ्यायची व माणसाच्या विकासचे सर्व द्वार बंद करून टाकायचे अशी कुटील व्यवस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्धवस्त करून लावली. या व्यवस्थेचे गुलाम कोण होते? या व्यवस्थेने कोणाचे शोषण केले? धुर्त लोकांनी कोणाला लुबाडले? यांनी कोणा कोणाचे हक्क अधिकार नाकारले? कोण कोणापेक्षा श्रेष्ठ होते? याचे एकाच शब्दांत असे उत्तर आहे ते म्हणजे जात. आज जेवढ्याही जाती आहेत त्या सर्वच जाती गुलाम होत्या, हक्क अधिकार नव्हते, विकासासाचे सर्व दारे जाती साठी बंद होते. आणि यातीमधील कोणत्याही व्यक्तीला लिहण्याचा, बोलण्याचा, जागृती करण्याचा अधिकार नव्हता. उदाहरण म्हणून बघायचे झाले तर संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात का बुडवाव्या लागल्या? आणि कोणी बुडवल्या हे जर आपण सत्य समजून घेतले तर आपल्या लक्षात येईल येथे तुकाराम महाराज यांना सुद्धां त्रास झाला. तुकाराम महाराज जातीने कुणबी-मराठा, दुसरे उदाहरण म्हणजे महात्मा फुले यांना वरातीतुन बाहेर कोणी आणि का काढले? याचे उत्तर शोधायला गेले तर ज्यांनी तुकारामांच्या गाथा बुडवल्या त्यांच लोकांनी महात्मा फुले यांना वरातीतुन बाहेर काढले. महात्मा फुले माळी समाजाचे. राजश्री शाहु महाराजांचे वेदोक्त प्रकरण आपल्याला माहीतच आहे. राजर्षी शाहू महाराजांना त्रास देणारे विकृती कोण? शाहु महाराज मराठा समाजाचे. हा सांगण्याचा उद्देश फक्त हाच आहे कि आपण जातीचा गर्व करणे निव्वळ मुर्खपणाचे आहे कारण जात निर्माण करून आपल्यावर गुलामीच लादण्यात आली, जातीच्या नावाखाली माणसला माणसाने तुच्छ लेखुन एकमेकांचा द्वेष करायला लावला. शेवटी सर्व जाती ह्या गुलामच. आणि या सर्व गुलामांना स्वाभिमान, या सर्व मुक्यांचा वाचा फोडणारे मुकनायक, या सर्वांना शिक्षण, नोकरी, समान हक्क अधिकार, मान सन्मान, अस्तित्व निर्माण करून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत म्हणून तेच खऱ्या अर्थाने मानसाचे उद्धारक आहेत. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती फक्त एकाच जातीने नव्हे तर प्रत्येक भारतीयांनी अति आनंदाने साजरी करणे आवश्यक आहे. कारण बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांचा समान उद्धार केला आहे. म्हणून बाबासाहेब समाजात पेरण्यासाठी आणि देशाचे हित साध्य करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातीच्या लोकांची गरज नाही तर भिमाच्या मताचे लोक पाहिजे म्हणून वामनदादा म्हणतात-





विनोद पंजाबराव सदावर्ते
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

**भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते**
**तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते**
**वाणीत भीम आहे करणीत भीम असता**
**वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते**

आज आपल्या देशात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याची फॅशन झाली आहे. उठसुठ कोणत्याही कार्यक्रमात बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते, मोठमोठ्या बॅनरवर बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लागतो, राजकीय नेते बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्या शिवाय भाषण बंद करत नाही. थोडक्यात काय वाणीत भिम आला परंतु करणीतुन भिम गायब झाला. दररोज जयभीम बोलणारे लोक बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या विरोधात वागतात, बँनर लावणारे भाषण देणारे नेते बाबासाहेब आंबेडकरांचे नाव तर घेतात परंतु काम मात्र विचारधारेच्या विरोधात करतात, सर्वसामान्य मानसाला फसवणारा, भुलथापा मारून वेळ काढून घेणारा खऱ्या अर्थाने भिमविरोधी आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा व्यक्ती शिक्षण, नोकरी, समता, बंधुता, सामाजिक न्याय या बाबींवर काम करतो. परंतु हल्ली हे कोणीही करताना दिसत नाही. याचे कारण महार लोक डॉ बाबासाहेब यांना मानतात ते जातीचे आहेत म्हणून, आणि इतर लोक स्विकारत नाहीत कारण ते जातीचे नाहीत म्हणून. आणि हेच सर्वात घातक आहे. थोडक्यात बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कोणाकोणासाठी आहे याची जाणीव करून घेऊ जे विद्यार्थी शिक्षण घेतात, जे नोकरी करतात, जे पगार घेतात, ज्या महिला शिक्षण घेतात, शिक्षण घेताना मोफत शालेय साहित्य, नोकरी करताना पुरुषां प्रमाने पगार, प्रसुती पगारी रजा, बोनस, पेन्शन, जे शेतकरी वेगवेगळे शेतीसंदर्भात अनुदान घेतात, जे कामगार आठ तास काम व जास्त वेळ काम झाल्यास वाढीव पगार घेतात, या सर्वांवर बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत. ज्या महिला दुसरे लग्न करू शकतात, पती व वडीलांकडील संपतीत वाटा मागु शकतात, मुल दत्तक घेऊ शकतात, आणि मनात येईल तिथे फिरू शकतात, मनात येईल तसे कपडे घालु शकतात हे बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. एवढेच नाही तर मोठ्या थाटामाटात मतदेण्यासाठी जातो तो मताधिकार सुद्धां बाबासाहेब आंबेडकर यांचाच आहे. निवडणुकीत उभे राहतो ते सुद्धां डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. हे सर्व करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणाची जात बघितली नाही. परंतु देशात शोकांतिका आहे की बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना बहुसंख्य जातीचे लोकच साजरी करतात. जाती मुळे नाही पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची जाणीव ठेवून बाबासाहेब समजून घेणे गरजेचे आहेत. जाती धर्माचा गर्व करून पोटभरू नेत्यांच्या मागे लागून स्वतःला दंगलीत गुन्हेगार करून घेतल्या पेक्षा मी प्रथम भारतीय व अंतिमतः भारतीय म्हणणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने गेलात तर देशाचे भले होईल. अडाणी आणि गुन्हेगार नेत्याचे ऐकून हातात दगड घेतल्या पेक्षा जागतिक ज्ञानाचे प्रतिक असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने जाऊन देशाची शासनकर्ता जमात झाला येणाऱ्या पिढ्या सुखी होतील. चला बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, त्यांचे शिक्षण यामुळे आमचा उद्धार झालाच. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अजून एक संस्कार म्हणजे नैतिकता, आपले चारित्र्य. बाबासाहेब चारित्र्यवान होते म्हणून तरी आम्हाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मानावेच लागेल. आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ज्या कायद्याने आमचा देश चालतो, प्रत्येकाला मान सन्मान मिळतो आणि आमच्या हक्क अधिकाराचे संरक्षण करणारे जगातील सर्वोत्कृष्ट संविधान लिहणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने देशाचे सुपुत्र आहेत. आणि एक भारतीय म्हणून, देशाचा इमानदार नागरिक म्हणून आम्हाला बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून जयंती दिनी आनंद झालाच पाहिजे. आणि एवढे असुनही जर आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना एका जातीचेच उद्धारक मानु, बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी मनात मनोमन आनंद होत नसेल तर आपण देशद्रोही आहोत. कारण देशाचे संविधान लिहणाऱ्या घटनाकाराला विरोध म्हणजे घटनेला विरोध. आणि घटनेला विरोध हा देशद्रोह असतो. जाती धर्म सोडून भिमाचे कर्म बघा डोळ्यातून पाणी येईल. एक रुपया आपण कोणाला फुकट देत नाही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची पुर्ण कमाई देशाच्या हितासाठी खर्च केली. घरात मुलाला किंवा बायकोला थोड जरी बरं नसले तर सर्व कामधंदे सोडून बायको मुलांकडे बघतारे आम्ही. याच बाबासाहेब आंबेडकर यांनी चार मुलं आणि बायको समाजाच्या हितासाठी मातीत घातले. एवढा भिमाचा त्याग येथे समता, बंधुता सामाजिक न्याय व हक्क अधिकारासाठी होता. आणि त्याग करून ही बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करत असाल तर आपल्या एवढे बेईमान कोणी च नसेल. भिम माझा कसा होता हे सांगाताना वामनदादा यांच्या ओळी आठवतात...

**काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता**
**लेकराला जशी माता , भीम माझा तसा होता !**
**कायद्याच्या स्वरूपाने त्याच माझ्या दयाळाने**
**दान केला ह्या देशाला , ज्ञान साठा असा होता !**

वामनदादा यांनी सांगितल्या प्रमाणे भिम माझा सर्वकाही होता. म्हणून वामनदादा पुन्हा म्हणतात.


**उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे**
**उद्धरली कोटी कुळे । भीमा तुझ्या जन्मामुळे**
**एक ज्ञान ज्योतीने कोटी कोटी ज्योती**
**तळपतात तेजाने तुझ्या धरती वरती**
**अंधार दूर तो पळे -भीमा तुझ्या जन्मामुळे**

आमचा उद्धार बाबासाहेब आंबेडकर यांनी केला म्हणून आम्हाला बाबासाहेब आंबेडकर यांना समाजात पेरावे लागतील. फक्त नाचुन बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार नाही तर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची मानसे तयार झाली तर तीच जयंती जल्लोषात साजरी होईल. म्हणून चला भिमजयंती साजरी करू, भिमाचे विचार समाजात पेरू.

भिमजयंतीच्या मंगलमय सदिच्छा..

# विद्यार्थी आणि युवकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



आजच्या विद्यार्थ्यांकडे, युवकांकडे अनेक शैक्षणिक साधने आहेत. शिक्षणाच्या विविध संधी आणि इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. असे असतानाही 'डिप्रेशन, फ्रस्ट्रेशन आलंय' असे शब्द आपल्या कानावर पडतात. काही लोक नकारात्मकतेच्या गर्तेत अडकून आयुष्य संपवण्याचाही विचार करतात. मात्र २१ व्या शतकात एवढी साधने उपलब्ध असताना आपल्या मनात असे विचार येत असतील तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा शिक्षण घेतले तेव्हाची काय परिस्थिती असेल याचा विचार आपण नक्कीच केला पाहिजे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख केवळ भारतात नव्हे तर जगाच्या पाठीवर आहे. भारतासारख्या जगातील दुसऱ्या सर्वात मोठ्या देशाला जगातील सर्वात मोठी आणि आदर्श राज्यघटना ज्या महामानवाने दिली त्या महामानवाच्या आयुष्यात अगदी सुरुवातीपासून अनेक संकटे आ वासून उभी होती मात्र त्या प्रत्येक संकटांना तोंड देत, त्यावर मात करत बाबासाहेब आंबेडकर वाट चालत राहिले. आपल्या सबंध आयुष्यात त्यांनी देशासाठी प्रचंड मोठे योगदान दिले. आणि म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांसाठी, युवकांसाठी आणि सर्वच समाज घटकांसाठी प्रेरणादायी आहे.

दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारत देशासह जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जाते. मात्र त्यांची जयंती केवळ एक औपचारिकता म्हणून साजरी न करता त्यांचा जीवनप्रवास आणि त्यांनी दिलेल्या मूल्यांची जाणीव नव्या पिढीला करून देणे, ही काळाची गरज आहे. विशेषतः विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाकडे फक्त इतिहास म्हणून न पाहता एक प्रेरणास्रोत म्हणून पाहायला हवे. बाबासाहेबांना लहानपणापासूनच सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. शाळेत बसायला जागा नसायची, पाणी पिण्यासाठीही इतरांची मदत घ्यावी लागायची. असे कटू अनुभव त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग होते. मात्र या सर्व वागणुकीवर त्यांनी शिक्षणाच्या बळावर मात केली. शिक्षण हेच या सगळ्या गोष्टीतून मुक्तीचे साधन आहे, हे त्यांनी आपल्या आयुष्यातून सिद्ध केले.

बाबासाहेबांनी केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमधून शिक्षण घेतले. जगाच्या पाठीवरील प्रख्यात कोलंबिया विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अशा संस्थांमधून त्यांनी शिक्षण घेतले, डॉक्टरेट प्राप्त केली. अंत्यत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी ज्ञानाची कास धरली आणि स्वकर्तृत्वाने स्वतःला सिद्ध केले. बाबासाहेबांनी केवळ स्वतःसाठी शिक्षण घेतले नाही तर संपूर्ण समाजासाठी त्याचा उपयोग केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार यासह बहुजन समाजाचे नेते, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, पत्रकार आणि विचारवंत अशी त्यांची विविधांगी ओळख आहे.

आज २१ व्या शतकात विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध आहेत. डिजिटल शिक्षण, ऑनलाईन क्लासेस, शिष्यवृत्ती, मोफत शाळा-कॉलेजेस या सर्व गोष्टींमुळे शिक्षण अधिक सुलभ झाले आहे. मात्र तरीही आज शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी न मिळवता समाजाच्या उत्थानासाठीही मिळवलं पाहिजे हेही समजून घेण्याची गरज आहे. शिक्षण हे समाज घडवण्याचे माध्यम आहे हे बाबासाहेबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. आज विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनाचा अभ्यास केला पाहिजे. त्यांनी लिहिलेली, वाचलेली हजारो पुस्तके, त्यांनी लिहिलेल्या संशोधनग्रंथ वाचले पाहिजेत. त्यांच्या वाङ्मयातून प्रेरणा घ्यायला पाहिजे. अलीकडे सोशल मीडियाचा अतिवापर, तात्पुरती करमणूक आणि यशाचे शॉर्टकट अशा चुकीच्या प्रवृत्ती वाढू पाहतायत. त्यामुळे मेहनत, चिकाटी, आणि जिद्द यांचा अभाव जाणवतो. या पार्श्वभूमीवरही बाबासाहेबांचं जीवन आपल्याला सर्वार्थाने प्रेरणादायी आहे.

आजच्या युवकांनी बाबासाहेबांच्या जीवनातून बोध घेण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. बाबासाहेबांनी केवळ आपलं आयुष्य घडवलं नाही तर संपूर्ण वंचित समाजासाठी लढा दिला, लाखो करोडो लोकांच्या आयुष्याला कलाटणी दिली. आज आपण जे अधिकार वापरतो ते बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचा परिणाम आहेत. शिक्षण, समता, बंधुता आणि न्याय यांचा पाया बाबासाहेबांनी रचला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे समाज उजळून टाकणारा एक विचार, चळवळ आणि प्रेरणा आहेत. त्यांनी दाखवलेला मार्गावर विद्यार्थ्यांनी, युवकांनी मार्गक्रमण केल्यास त्यांचे व्यक्तिगत आयुष्य तर समृद्ध होईलच, त्यासोबत एक सशक्त समाज देखील निर्माण होईल.

**- प्रशांत वाघाये**
**दिल्ली प्रतिनिधी,**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२


# वळसंग विहिर ऐतिहासिक स्थळाच्या प्रकल्पाचे काम आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याने अंतिम टप्प्यात

## डॉ. बाबासाहेबांनी २४ जानेवारी १९३७ मध्ये उद्घाटन केलेल्या ऐतिहासिक वळसंग विहिरीला भूकंपरोधक भव्य आर.सी.सी.स्तूप







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : वाटेत कुंभारीकर योगीबुवा आणि समस्त मंडळी यांनी आपल्या चावडीसमोर मुद्दाम उभारलेल्या मंडपात केलेली पानसुपारी हारतुरे घेऊन ११-२५ च्या सुमारास बाबासाहेब वळसंगला पोचले. तेथेही वळसंग कुंभारी, सलगर, मंगळूर भागातून व अक्कलकोट संस्थानातून तीन हजारावर लोकसमुदाय जमला होता. नंतर तेथील कारभारी श्री.ॐकारप्पा वळसंगकर यांनी स्वागत केले.सोलापूर जिल्हा लोकलबोर्डाने बांधून दिलेल्या विहीरीतून पाणी काढण्याबद्दल लोकांनी विनंती केल्यावरून चांदीच्या गडव्याला बांधलेला रेशमचा दोर ओढून बाबासाहेबांनी विहिरीतून पाणी काढले. लोकांनी प्रसाद म्हणून पाणी मागताच बाबासाहेब विनोदाने' दक्षिणा काढा' असे म्हणाले व सर्वत्र हंशा पिकला.अखेर बाबासाहेबांना लोकांना पाण्याचा प्रसाद द्यावा लागला. लोकांनी सदर विहीरीचे नाव आंबेडकर बावडी असे ठेविले व डॉ. बाबासाहेब सोलापुरास रवाना झाले.असे ऐतिहासिक असलेल्या वळसंग येथील बाबासाहेब आंबेडकर उद्घाटन केलेल्याऐतिहासिक विहिरीचे येणाऱ्या पिढीस प्रेरणादायी ठरावे यासाठी लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी सर यांनी या कामासाठी सतत पाठपुरावा करीत असून यासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगितले आहे

**अभियंता राजेश जगताप या ऐतिहासिक स्थळाच्या प्रकल्पाचे काम पाहत आहे**

**सोलापूरचे बहुजन चळवळीचे नेते माजी गटनेता व नगरसेवक मा. आनंद चंदनशिवे सर यांनी सन २०२० पासून या कामासाठी प्रयत्न शील असून आमदार मा. सचिन कल्याणशेट्टी सर यांच्याकडून पाठपुरावा करून निधीसाठी प्रयत्न करीत आहेत.**

स्वातंत्र्यपूर्व काळात वळसंग येथे २४ जानेवारी १९३७ मध्ये चांदीच्या ग्लासात पाणी पिऊन विहिरीचे उदघाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते केले होते. या ऐतिहासिक स्थळ असलेल्या विहिरीचे जतन व्हावे, ती येणाऱ्या पिढीस प्रेरणादायी ठरावी, यासाठी ऐतिहासिक स्थळ विकसित करण्याचे काम अक्कलकोट विधान सभा आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून निधी मंजुर करून घेत आहेत



* ऐतिहासिक घटना ८८ वर्षे पूर्ण झाली.

धम्म विपश्यना केंद्र अद्यावत वाचनालय सभागृह उभारणार

* जिल्हा नियोजन समितीकडून आतापर्यंत मिळालेल्या १ कोटी ५० लाखाचा निधीतून विहिरी लगत २ फुट व्यासाचे १६. मोठे आर.सी.सी. गोलाकार कॉलम उंची ही २२ फुट असून त्याच्या वरती ३० फूट उंचीचा भूकंपरोधक आर.सी.सी. स्तूप बांधला आहे.

* वळसंगचे स्वातंत्र्य सैनिक गुरुसिद्धप्पा अंटद यांनी त्यांच्या बैलगाडी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विहिरीवर उद्घाटनासाठी आणले होते. आज त्यांचे नातू श्री. जगदीश अंटद हे सध्या वळसंगचे विद्यमान सरपंच आहेत.

ख्यातनाम प्रशासकीय अधिकारी असणाऱ्या वडीलापासून सामाजीक बांधिलकीची प्रेरणा घेऊन वंचित व दारिद्र्य रेषा खालील समाजासाठी काय करता येईल व ते चांगल्या उत्तम दर्जाचे काम कसं होईल प्रत्येक काम हे पारदर्शक व चिरस्थायी असायला हवं याची भूमिका बजावणारे म्हणजे शाखा अभियंता श्री.राजेश जगताप त्याच्या कार्यालयात गेल्यावर प्रथम दर्शनी दिसणारा डळपलश १९९६ पगारात भागवा अभियान मी माझ्या पगारावर समाधानी आहे असा बोर्ड दिसेल जे काम आहे ते चांगल्या दर्जाचे व्हावे यासाठी त्यांनी स्वतः उन्ह पाऊस न पाहता त्यासाठी ते स्वतः कामावर हजर असतात त्यांनी अक्कलकोट येथील पंचायत समिती विस्तारीत इमारत बांधकाम उत्कृष्टरित्या भूकंपरोधक पद्धतीचा अवलंब करून महाराष्ट्र शासनाची रक्कम रुपये ६ लाख ही आर्थिक बचत केली आहे आज इमारत ही मोठ्या दिमाखात आज पाहावयास मिळत आहे त्यांच्या कामाची एक वेगळी पद्धत आहे. गेली २८ वर्षे त्यांनी तांत्रिक कामामध्ये कुठलीच तडजोड केली नाही अशा सामाजिक अभियंता (सोशल इंजिनिअरींग) खऱ्या अर्थाने राबवले आहे शाखा अभियंता राजेश जगताप सर यांच्यावर वळसंगचे ऐतिहासिक विहिरीचे सुशोभीकरण विकास कामाची जबाबदारी त्याच्यावर आहे.

**– कमलाकर सोनकांबळे (संपादक, दैनिक यश सिध्दी न्युज)**

### अनुसूचित जाती नव बौद्ध विकास वस्तीच्या विकासासाठी महत्वपूर्ण पुढाकार व भूमिका

अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट तालुक्यातील मागासवर्गीय वस्तीचे विकासासाठी मोठ्याप्रमाणात निधी आणून आपल्या मतदार संघातील वस्त्याचे विकास व्हावे यासाठी प्रयत्नशिल आहेत त्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्घाटन केलेले ऐतिहासिक स्थळाच्या विकासासाठी पुढाकार घेऊन काम पूर्ण करण्यासाठी निधी कमी पडणार नाही याकडे लक्ष दिले आहेत.

**– आमदार सचिनदादा पंचप्पा कल्याणशेट्टी सर**

भूकंपरोधक स्तूप तसेच सांस्कृतिक भवन, धम्म केंद्र, विपाश्यना केंद्र, वाचनालय, प्रशिक्षण केंद्र उभारुन सभोवतालचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. सन २००९ पासून या ऐतिहासिक प्रेरणादायी स्थळाचा विकास करणे व नाविण्यपूर्ण आराखडा साठी सतत यशस्वी पाठपूरावा केला असे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग दक्षिण सोलापूर विभागाचे कर्तव्यदक्ष प्रामाणिकपणे काम करणारे शाखा अभियंता राजेश जगताप सर हे या ऐतिहासिक स्थळाच्या भव्य प्रकल्पाचे तांत्रिकदृष्ट्या काम हे अहोरात्र त्याठिकाणी थांबून पाहात आहेत.आमदार मा. सचिन कल्याणशेट्टी सर आणि मा.आनंद चंदनशिवे माजी गटनेता सोलापूर महानगरपालिका यांनी या स्थळाच्या उभारणीसाठी पाठपुरावा केला.

# स्वेरीच्या सिव्हिल इंजिनिअरिंग पॉलिटेक्निकचा अभ्यास दौरा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) च्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०२ एप्रिल ते ०३ एप्रिल २०२५ या दोन दिवसीय औद्योगिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते. या अभ्यास दौऱ्याचा सदर विद्यार्थ्यांना भविष्यात नक्कीच फायदा होणार आहे.




'इंडस्ट्रीयल व्हिजीट' हा अभियांत्रिकी शिक्षणातील एक महत्त्वाचा भाग असून या अभ्यास दौऱ्यात सिव्हिल इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. इंडस्ट्रीयल व्हिजीट म्हणजे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कंपनी/ कारखान्यात जाऊन तेथील कामकाज पद्धती जाणून घेणे. या व्हिजीटमुळे विद्यार्थ्यांना उद्योगांबद्दल माहिती मिळते आणि त्यांना प्रेरणा मिळते. इंडस्ट्रीयल व्हिजीटमध्ये विद्यार्थ्यांना कारखान्यात चालणारी कार्यप्रणाली पाहण्याची संधी मिळते. इंडस्ट्रीयल व्हिजीटमुळे विद्यार्थ्यांना उद्योगांबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळते आणि त्यांना त्यांचे शैक्षणिक कार्य अधिक गतीने करण्यासाठी प्रेरणा मिळते तसेच उद्योगांबद्दल अद्ययावत माहिती मिळते. या विद्यार्थ्यांनी बांधकामाच्या दृष्टीने सिव्हिल इंजिनिअरिंगचा उत्तम नमुना असलेले प्राचीन स्थापत्य शास्त्र, धार्मिक स्थळांच्या वास्तु, शिल्प, घनकचरा व्यवस्थापन, तसेच स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग यांची माहिती घेतली. नाशिक वेष्ट मॅनेजमेंट प्लांट (एन.डब्ल्यु. एम. पी.) विपासना रिसर्च सेंटर, पांडव लेणी, त्र्यंबकेश्वर आणि हरिश्चंद्रगढ या ठिकाणी ही त्यांनी भेटी दिल्या. नाशिक वेष्ट मॅनेजमेंट प्लांट येथे तांत्रिक अधिकारी संजय बोरसे यांनी घनकचरा व्यवस्थापन कसे करावे यावर तर विपासना रिसर्च सेंटरमधील अधिकारी अशोक राजगड यांनी स्ट्रक्चर बाबत सखोल माहिती दिली. सदरचा औद्योगिक अभ्यास दौरा हा स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार व प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांच्या सहकार्याने व विभागप्रमुख प्रा. ए.एच. कलुबर्मे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला होता. या अभ्यास दौऱ्यामध्ये ६५ विद्यार्थ्यांसह प्रा. ए.जी. इंगळे, प्रा. ए. एन.शिंदे, आणि प्रा. आर.एम. पावले यांनी सहभाग घेतला.

# हर हर महादेव श्री मल्लिकार्जुन महाराज की जय.... या जयघोषात मल्लिकार्जुन यात्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : हर हर महादेव श्री मल्लिकार्जुन महाराज की जय.... या जयघोषात तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथे गेल्या पाच दिवसापासून सुरू असलेले ग्रामदैवत मल्लिकार्जुन यात्रेची मानाच्या नंदीध्वजाच्या भव्य मिरवणुक रथोत्सवाने सांगता करण्यात आली. यावेळी मल्लिकार्जुन महाराज की जयच्या जयघोषात सारा आसमंत दुमदुमून गेला होता. शोभेच्या दारूच्या आतिषबाजीने उपस्थित भाविकांचे लक्ष वेधून घेत होते.



ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा सांगता भक्ती भावाने साजरी झाली. तीर्थक्षेत नगरी भल्या पहाटेच घरोघरी सडा रांगोळी चालू होती. एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस यात्रेतील प्रमुख पाच नंदीध्वजांची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. पाटील, नंदीकोले, लिंबीतोटे, आडवीतोटे, रोडगे आधी पाच नंदीध्वजांचे मानकरी आहेत. सकाळी श्रींना अभिषेक, नैवेद्य, आरती, दुपारी शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य नंदीध्वजाची मिरवणूक निघून सायंकाळी सूर्यास्तावेळी श्री मल्लिकार्जुन मंदिराजवळ पोहचली. मिरवणुकीत बाराबंदी, पांढरा पोशाख घातलेले सदभक्तांनी साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. नंदीध्वजांची प्रदक्षिणा मंदिरास झाली. विरक्त मठाचे मठाधिपती श्री.म.नी. प्र. बसवलिंग महास्वामी यांच्या हस्ते पूजन करून रथोत्सवास प्रारंभ करण्यात आला.

मंदिर, बसस्थानक परिसर भाविकांनी फुलला होता. बाल गोपाळांचे छोटे नंदीध्वज, मोठे नंदीधज, विद्युत रोषणाईने सज्ज, शोभेच्या दारूची भव्य आतिषबाजी याने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. नंदीध्वजाचे मानकरी व त्यांच्या सर्व सहकारी व भाविकांना समर्थ चौक येथे याळवार परिवाराकडून व शहरातील विविध मार्गावर विविध ठिकाणी विविध प्रकारच्या मठ्ठा, सुगंधी दूध, खजूर, सोनपापडी, लाडू, पाणी बॉटल आधीचे वाटप करण्यात आले.


यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अनछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले, ग्रामदैवत मल्लिकार्जुन देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोले, राजशेखर हिप्परगी, प्रथमेश इंगळे, श्री स्वामी समर्थ आणि छत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, सिद्धेश्वर कल्याणशेट्टी,शिवशरण जोजन, मिलन कल्याणशेट्टी, माझी जि प सदस्य मल्लिकार्जुन पाटील, दिलीप सिद्धे, अविनाश मडिखांबे, प्रशांत लोकापुरे, बसवराज माशाळे, राजकुमार नागोरे, स्वामीनाथ हिप्परगी, श्रीकांत झिपरे, रमेश कापसे, मल्लिनाथ बहिर्जी, दयानंद बिडवे, शिवराज स्वामी, अरुण लोणारी, महेश शावरी, अशपाक बळवर्गी, राजशेखर उमराणीकर, नीलकंठ कापसे, सुनील गोरे, रुद्रया स्वामी, यांच्यासह हजारो मल्लिकार्जुन भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**झेंड्यांवरील मजकुराच्या माध्यमातून एकता, समता आणि बंधुभावाचा संदेश**

**भव्य दुचाकी रॅली**

# इंदापूर येथे महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर तालुका प्रतिनिधी / अतुल सोनकांबळे : इंदापूर येथे महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भव्य दुचाकी फेरी काढण्यात आली. प्रत्येक दुचाकीला पिवळे झेंडे रंगाचे वादळ पाहायला मिळाले. झेंड्यांवरील मजकुराच्या माध्यमातून एकता, समता आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

श्री संत सावतामाळीनगर येथे महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले याँ प्रतिमांचे पूजन करून दुचाकी रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. महात्मा फुले रोड चाळीस फुटी येथे दुचाकी रॅलीची सांगता झाली. महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. या रॅलीत प्रत्येक दुचाकीवर ११ एप्रिलचे महत्त्व इंदापूर महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त काढलेली दुचाकी फेरी.

अधोरेखित करणारे पिवळे झेंडे फडकताना दिसले. तसेच, तरुणांच्या हातात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पोस्टर झळकत होते. यावेळी नगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेता पांडुरंग शिंदे, माजी नगरसेवक पांडुरंग शिंदे, पोपट शिंदे, अमर गाडे, राजकुमार राऊत, प्रशांत उंबरे, विशाल फोंडे, दादाराम राऊत, शेखर राऊत, महेश राऊत, अक्षय सूर्यवंशी, ॲड. अविनाश गवळी, मेजर स्वानंद शिंदे, महात्मा फुले जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष अतुल शिंदे, उपाध्यक्ष सौरभशिंदे, खजिनदार सचिन राऊत, सिद्धार्थ खरवडे, गौरव राऊत, तेजस शिंदे आदी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय वारसा म्हणून रिपब्लिकन पक्षाचे देशात वाढणारे प्राबल्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
लेखक केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

भारतीय संविधानाचे शिल्पकार प्रज्ञासुर्य,बोधिसत्व,युगप्रवर्तक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा..... महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला लढा हा मानव मुक्तीचा लढा आहे.समता,बंधुता,न्याय,स्वातंत्र्य आणि लोकशाहीचा लढा आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांची प्रेरणा घेऊन जगभरात काम करणाऱ्या,मानवी हक्कासाठी लढणाऱ्या सर्व भिम अनुयांयाना १३४ व्या भिम जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती महाराष्ट्राच्या गावागावात मुंबईच्या गल्ली-गल्लीत आणि भारत देशाच्या राजधानी दिल्लीत मोठ्या उत्साहात साजरी होते.संपूर्ण भारतात आणि अखंड विश्वात भिम जयंती साजरी होते.अमेरीकेत न्युयॉर्क मधील संयुक्तराष्ट्र संघाच्या मुख्यालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी होते.संपूर्ण जगात अमेरीकेचे ज्ञान,तंत्रज्ञान महासत्ता म्हणुन गौरव केला जातो. त्याच अमेरीकेत कोलंबिया विद्यापिठात ज्ञानाचे प्रतिक म्हणुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा पुतळा उभारण्यात आला आहे.ज्ञानाचा महासागर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरां समोर संपूर्ण जग नतमस्तक होत आहे.

ज्ञानसुर्य महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतुन साकार झालेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष आंबेडकरी विचारांचा खरा राजकीय वारसा आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मनाने,बुध्दीने,विचाराने साकार झालेला रिपब्लिकन पक्ष आमच्यासाठी परमपवित्र वारसा आहे.स्वतंत्र आणि मजबुत वैचारीक बैठक रिपब्लिकन पक्षाला लाभलेली आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा ऐतिहासीक वारसा रिपब्लिकन पक्षाला लाभलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पक्ष म्हणुन रिपब्लिकन पक्षाची ओळख संपूर्ण जगात करुन देण्याचा माझा प्रयत्न आहे.आज भिम जयंती दिनी मला सांगताना अभिमान वाटतो की भारत देशाच्या २८ राज्यात आणि ५ केंद्रशासीत प्रदेशात रिपब्लिकन पक्षाचा अशोकचक्रांकित निळा झेंडा डौलाने फडकत आहे.भारत देशाच्या प्रत्येक जिह्यात,प्रत्येक गावात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष आणि निळा झेंडा पोहचवण्यात मी यशस्वी झालो आहे.येत्या १ नोव्हेंबर ला दुबईत संयुक्त अरब अमिरातीमध्ये रिपब्लिकन ग्लोबल फाऊंडेशनची स्थापना होणार असुन दुबईत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची रिपब्लिकन संकल्पना आणि निळ्या झेंड्यांचे काम तिथे सुरु होत आहे.नेपाळ मध्ये ही रिपब्लिकन पार्टी ऑफ नेपाळ सुरु आहे.संपूर्ण जगात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची रिपब्लिकन संकल्पना पोहचवण्यासाठी फ्रेंडस ऑफ रिपब्लिकन नावाने जगभरातील मला आ-ेळखणारे माझे मित्र रिपब्लिकन संकल्पना हा गौरवशाली वारसा असल्याचा स्विकार करीत आहे.रिपब्लिकन संकल्पना हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा आहे.हा वारसा जपण्याचे काम मी करीत आहे.अनेक लोकांनी आपल्या पक्षाचे नाव बदलले, रिपब्लिकन नाव पुसुन टाकण्याचा प्रयत्न केला.कोणी कितीही प्रत्यत्न केला तरी रिपब्लिकन नाव मिटू शकत नाही. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाचा राजकीय वारसा मला जो लाभला आहे. त्याचा मला अभिमान आहे.माझ्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यत्न मी रिपब्लिकन पक्ष वाढवत राहणार.रिपब्लिकन पक्षाचे नाव कधी ही बदलणार नाही.रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातुन असे चांगले काम करुया की संपूर्ण देशातील जनतेला रिपब्लिकन पक्षाचा अभिमान वाटला पाहिजे.प्रत्येकाला रिपब्लिकन हा आपला पक्ष वाटला पाहिजे.असे काम करण्याचा आपण भिम जयंतीदिनी निर्धार के

अलीकडच्या काळात नागालॅन्ड सारख्या दुर्गम भागात विधानसभा निवडणुका झाल्या. तेथे रिपब्लिकन पक्षाचे दोन आमदार हे स्वबळावर निवडुन आले. नागालॅन्डच्या विधानसभा निवडणुक निकालात रिपब्लिकन पक्षाचे २ आमदार निवडुन आले त्या बातमीने देशात मोठी रिपब्लिन पक्षाची चर्चा झाली. मला अभिमान वाटतो की, मी रिपब्लिकन पक्ष संपूर्ण भारतात तसेच ईशान्य भारतामध्ये मोठया प्रमाणात वाढवलेला आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष ३ ऑक्टोंबर १९५७ रोजी नागपुरमध्ये स्थापन झाला. तेव्हापासुन आतापर्यंत रिपब्लिकन पक्ष भारतात वाढला. मात्र ईशान्य भारतात तिथे पोहचला नाही. ईशान्य भारतात बहुजन समाज पक्ष सुध्दा नाही. आपली रिपब्लिकन पक्ष (आठवले) ईशान्य भारतात माझ्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्ष फाइनवर ठरतो आहे. ही ताकद म्हणून पुढे आलेला आहे. नागालॅन्डमध्ये भाजप आणि कॉग्रेस सारख्या मोठया उमेदवारांचा पराभव करुन रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार तेथे निवडुन आले. नागालॅन्ड विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचे २ आमदार आहेत. मणिपुर सारख्या राज्यात रिपब्लिकन पक्षाला १७ टक्के मतदान मिळाले आहे. आणि आगामी काळात तीथे किमान १५ आमदार रिपब्लिकन पक्षाचे निवडुन येतील अशी ताकद या राज्यात निर्माण झालेली आहे. त्यामुळे निवडणुक आयोगाने रिपब्लिकन पक्षाला मणिपुर आणि नागालॅन्डमध्ये मान्यता प्राप्त पक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे. ऊस धारक शेतकरी( गन्ना किसान ) ही निवडणुक निशाणी रिपब्लिकन पक्षाला दिलेली आहे. रिपब्लिकन पक्षाला आणखी दोन राज्यात मान्यता मिळाली तर एकुण ४ राज्यात मान्यता मिळविणाऱ्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते.आगामी काळात ४ पेक्षा जास्त राज्यात रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळून रिपब्लिकन पक्ष राष्ट्रीय मान्यता प्राप्त पक्ष होईल. त्या दृष्टीने माझे काम चालु आहे. रिपब्लिकन पक्ष ईशान्य भारतातल्या नागालॅन्ड , आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोरम, सिक्कीम, त्रिपुरा, या सातही राज्यात आहे. संपूर्ण देशात आहे. तसेच पाँडेचेरी, लक्षद्वीप, पोर्टब्लेयर दीवदमण, दादरा नगर हवेली, या केंद्रशासीत प्रदेशामध्येही रिपब्लिकन पक्ष काम करीत आहे.

सन २०१६ साली मी भारत भीम यात्रा राष्ट्रीय स्तरावर जाती तोडो समाज जोडो, समता अभियान सुरु केले. त्या अंतर्गत भीम यात्रा संपूर्ण देशात काढली. त्यावेळी कन्याकुमारी येथे या भारत भीम यात्रेचा प्रारंभ केला. कन्याकुमारी, तामिळनाडु कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, पश्चिम बंगाल, आसाम, उडिसा , छत्तीसगढ, झारखंड, बिहार, उत्तरप्रदेश, काश्मिर, हिमाचल प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र या सर्व राज्यात भारत भिम यात्रा मी ६ महिन्यामध्ये पुर्ण केली. आणि तेव्हा संपूर्ण देशात रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते भारत भीम यात्रा यशस्वी करण्या करीता पुढे आले.तेव्हा मला दिसले की भारतीय दलित पँथरच्या काळापासून ज्या लोकांना सोबत जोडले होत ते लोक माझ्यासोबत आजही होते. त्यांनी रिपब्लिकन पक्षाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेवून आपल्या जिल्हयात काम केलेले आहे. गेली ४० - ४५ वर्ष मी देशभर फिरतोय. रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा घराघरात गावागावात पोहोचवतोय. त्या कामाला आता यश येतांना मला भारत भीम यात्रेमध्ये दिसले. १९७८ आणि ८० च्या दशकात मी पेरणी केली होती. त्याचे यश मला संपूर्ण देशामध्ये दिसु लागले आहे .भारतीय दलित पँथर हे माझे संघटन १९९० मध्ये बरखास्त करुन अखंड एकजुटीचा रिपब्लिकन पक्ष उभा केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्नेतील रिपब्लिकन पक्ष या देशात भविष्य आहे. भारताचे भाग्यविधाते म्हणून डॉ. आंबेडकरांचे विचार या देशाला तारु शकतात. त्यांची संकल्पना असणारा रिपब्लिकन पक्ष या देशातला एक आदर्श पक्ष ठरु शकतो. रिपब्लिकन पक्ष या देशाचे योग्य नेतृत्व करु शकतो. दलित , शोषीत, पिडीत बहुजन, अल्पसंख्यांक आणि सवर्ण या सर्व जाती धर्मांतिल लोकांना समान न्याय देण्याची भूमिका रिपब्लिकन पक्ष देवू शकतो. त्यामुळे रिपब्लिकन पक्ष देशात वाढविण्याचा निर्धार केला. १९९० पासुन रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातुन संपूर्ण देशभर कार्यरत आहे.रिपब्लिकन पक्षाला मोठया प्रमाणात कार्यकर्ते लाभु लागले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष म्हणून संपूर्ण देशात रिपब्लिकन पक्षाला मानणारा एक वर्ग तयार झाला आहे .रिपब्लिकन पक्षाचे सुरुवातीच्या काळात खासदार, आमदार हे अनेक राज्यात निवडुन आलेले होते. १९९८ मध्ये जेव्हा रिपब्लिकन ऐक्य झाले तेव्हा आम्ही महाराष्ट्रातुन ४ खासदार निवडुन गेलो होतो. तेंव्हा उगवता सुर्य ही निवडणुकी निशाणी आम्हाला मिळाली होती. रिपब्लिकन पक्षाच्या गटबाजीच्या माध्यमातुन त्याला खिळ बसली. या गटबाजीकडे दुर्लक्ष करुन मी मोठया हिंमतीने रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्राच्या गावागावात आणि संपूर्ण देशात पोहचविण्याचे काम केले. मी सतत रिपब्लिकन ऐक्याचा आग्रह धरला, सर्वांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी अनेक ऐक्याचे प्रयोग मी राबविले. रिपब्लिकन डावी लोकशाही समिती, रिडालोसचा ही प्रयोग मी महाराष्ट्रात केला होता.

रिपब्लिकन पक्षाला यश मिळविण्यासाठी सर्व जाती धर्मीयांना सोबत घेण्याचा आपला निर्धार आहे. २०१६ मध्ये जेव्हा मी पहिल्यांदा भारत सरकारचा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री म्हणून जेव्हा मला काम करण्याची संधी मिळाली त्यानंतर देशात रिपब्लिकन पक्ष मोठया प्रमाणामध्ये वाढु लागला. संपूर्ण देशात दलित, आदिवासी, ओबीसीं सोबत सवर्ण आणि अन्य समाजही रिपब्लिकन पक्षात मोठया प्रमाणात येऊ लागला. विविध जातीधर्माचे लोक रिपब्लिकन पक्षात येत आहेत. त्यामुळे आतापर्यंत कधीच नाही त्या ईशान्य भारताच्या दुर्गम भागात रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा हा डौलाने फडकत आहे. रिपब्लिकन पक्षाचे ईशान्य भारतातुन अनेक आमदार यापुढे निवडुन येणार आहेत.आसाम मध्येही रिपब्लिकन पक्षाची मोठी ताकद उभी राहीली आहे. कनार्टकमध्येही रिपब्लिकन पक्षाची मोठी ताकद आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाची मोठी ताकद आहे. त्याप्रमाणे गुजरातमध्येही रिपब्लिकन पक्षाचे काम चांगले चालु आहे. पाँडेचेरीमध्ये, दीव दमणमध्ये, लक्षद्वीपमध्ये रिपब्लिकन पक्षाची चांगली ताकद आहे. बिहारमध्येही रिपब्लिकन पक्षाची ताकद आहे. उत्तरप्रदेशात बसपला पर्याय म्हणून रिपब्लिकन पक्षाला स्वीकारले जात आहे. छोटयातुन मोठे होण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे नागालॅन्ड आणि मणिपुर या दोन छोटया राज्यामध्ये निवडणुक आयोगाची रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळाली आहे. भविष्यात महाराष्ट्रात, कर्नाटकात छोट्या राज्यांमध्ये आणि दीव दमन गुजरात तसेच पाँडेचेरी अशा केंद्र शासीत प्रदेश असणा-या छोटया राज्यांमध्ये रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळु शकते. आगामी काळात रिपब्लिकन पक्ष ४ - ५ राज्यांमध्ये मान्यता प्राप्त पक्ष होणार असून बळावर राष्ट्रीय पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळेल असा मला विश्वास आहे. एक जातीय पक्ष ही प्रतिमा पुसण्यात आम्ही महाराष्ट्राबाहेर यशस्वी झालो आहोत. महाराष्ट्रात एक जातीय पक्ष ही प्रतिमा पुसून सर्व जाती धर्मियांचा मुख्य प्रवाहातील पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाची ओळख निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.त्यात आम्हाला यश मिळत आहे.त्यामुळे रिपब्लिकन पक्षाची देशभर राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष होण्याच्या उद्दिष्टाकडे यशस्वी घोडदौड ही मोठया प्रमाणात होत राहणार आहे.

या देशात अनेक राज्यांमध्ये खासदार आणि आमदार निवडुण आणण्याची ताकद रिपब्लिकन पक्षाला लाभलेली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा ही रिपब्लिकन पक्षाची मार्गदर्शक वैचारीक मजबुत बैठक असल्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे घेवुन आम्ही देशभर चाललो आहोत. आमच्या मनाचा कोणताही विचार न सांगता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला विचार देशभर आम्ही प्रसारित करीत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले जे संविधान आहे त्याच विचाराने त्याच संविधानीक मुल्यांची प्रेरणा लोकांना देत रिपब्लिकन पक्षाचा समतेचा विचार घेवुन आम्ही पुढे चाललेलो आहोत.रिपब्लिकन पक्ष हा सर्व व्यापक पक्ष आहे. त्यामुळे देशात अनेक राज्यात सर्व जातीधर्माचे लोक आनंदाने रिपब्लिकन पक्षाचा स्विकार करीत आहेत. मला अभिमानाने सांगावेसे वाटते, आज संपूर्ण देशात रिपब्लिकन पक्ष एक प्रमुख पक्ष ठरलेला आहे. अनेक सामाजिक बांधीलकी असणा-या चळवळीचे पक्ष संपत चालले असतांना रिपब्लिकन पक्ष हा देशात वाढत आहे. याचा मला अभिमान आहे. अनेकांनी रिपब्लिकन संकल्पनेची साथ सोडली असली तरी आमचे मात्र रिपब्लिकन पक्षाला गौरवशाली पक्ष करण्याचे प्रयत्न सुरु आहेत .या देशात रिपब्लिकन पक्ष हा एक मुख्यप्रवाहातील प्रमुख पक्ष ठरेल. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील व्यापक, प्रबळ प्रमुख पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाला आम्ही या देशामध्ये मानाचे स्थान मिळवून देवू. त्या दृष्टीने आमचे काम सुरु आहे. बिहारमध्ये रिपब्लिकन पक्ष चांगला वाढत आहे. बिहार मध्ये मी आता गेलो असतांना अनेक पत्रकारांनी मला विचारले की आपण ४० वर्ष पेक्षा काळ जास्त बिहारमध्ये येत आहेत. आपले लोक इथे वाढत चाललेले आहेत. आपण बिहारमध्ये निवडणुका लढल्या पाहिजेत. मात्र मी त्याबाबत आगामी काळात विचार करणार आहे.मात्र नितीश कुमार यांनी मला निमंत्रण दिले. येत्या विधानसभा निवडणुकीत मी नितीशकुमार आणि एनडीएच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाणार आहे. बिहारमध्ये रिपब्लिकन पक्षाची ताकद आहे. ती ताकद वाढत राहणार आहे. रिपब्लिकन पक्षाला सामाजिक, वैचारिक क्रांतीचा वारसा लाभलेला आहे. सांस्कृतीक संघर्षाचा सुध्दा वारसा लाभलेला आहे. हा सामाजिक आणि आर्थिक समतेचा विचार रिपब्लिकन पक्षाच्या गाठीशी आहे. त्यामुळे आंबेडकरी जनता ही रिपब्लिकन पक्षाच्या पाठीशी आहे. एवढी ताकद आम्ही देशभरात वाढवित आणणार आहोत. संसदेवरही रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा फडकेल. असा दुर्दम्य आत्मविश्वास रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या मनात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतला रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न करीत राहणार आहे. रिपब्लिकन पक्ष हा भारत देशाचा मुख्यप्रवाहातील प्रमुख पक्ष करणार आहे.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी आमचा हाच निर्धार आहे. जयभिम .!!!..



**– रामदास आठवले**
**राष्ट्रीय अध्यक्ष**
**रिपब्लिक. पार्टी ऑफ इंडिया**
**आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री**
**भारत सरकार**

---

## श्री बदीबाई यात्रेनिमित्त शिवशंकर फाऊडेशनच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी : दुधनी येथील शिवाजी नगर तांड्यातील बंजारा समाजाचे आराध्य दैवत श्री बदीबाई देवीच्या यात्रेत शिवशंकर फाउंडेशनच्या वतीने शंकर राठोड परिवाराच्या वतीने कै मांतू राठोड यांच्या स्मरणार्थ पाणपोईचे उदघाटन सेवानिवृत सपोलीस आयुक्त मोतीचंद राठोड व मोरया कंस्ट्रक्शनचे अशोक राठोड यांच्या उपस्थित करण्यात आले . प्रथम कै मांतू राठोड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले . व नंतर केळी व पाईनापल थंड पेय देखील भाविकांना वाटप करण्यात आले . यावेळी सेवानिवृत सा पोलीस आयुक्त मोतीचंद राठोड व पोमू राठोड यांनी पाण्याचे महत्व सांगितले. यावेळी जेष्ठ शंकर राठोड, नायक हरीचंद्र राठोड, कारभारी लालू पवार, मन्नू राठोड, लक्ष्मण राठोड, पोमू राठोड, पोलीस कांतू राठोड, मुकेश राठोड, सुनिल राठोड, दिलीप राठोड, विश्वनाथ राठोड, हुसेन जाधव, धोंडू राठोड, तुकाराम पवार, गुरुनाथ राठोड, गोकुळ पवार, शिवा चव्हाण, बाबु राठोड, विलास पवार, डॉ. सुनिल चव्हाण, प्रविणकुमार राठोड, मुकेश पवार, गणपती राठोड, अनिल राठोड, तिप्पू जाधव, शिवबाई राठोड, अश्विनी राठोड इत्यादी उपस्थित होते.





## भोसे येथील दलित वस्ती व खारे वस्ती येथे बोर घेऊन पाण्याची सोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भोसे या गावी आदरणीय स्वर्गीय वैजनाथ (दादा) व बाळासाहेब (नाना) यांनी घालून दिलेला समाज-सेवेचा व दीनदलंदांच्या मदत करण्याची संकर्षण व त्यांची समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा आकांक्षा व त्यांची कायमस्वरूपी गोरगरिबांना मदत करण्याची इच्छा पूर्ण केली असल्याची.

भोसे येथील दलित वस्ती व खारे वस्ती येथे मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई भासत होती व ग्रामस्थांनी पाण्याची सोय करण्यास सांगितले व त्यांच्या विनंतीस मान देऊन आज दलित वस्ती व खारे वस्ती येथे बोर घेऊन भरपूर पाणी लागले असल्याची सांगून तेथील लोकांना पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

यावेळी श्री संजय तळेकर, श्रीमारुती भाऊ कोरके, श्री राजकुमार टरले, श्री तुकाराम म्हस्के, मोहन तळेकर, श्री भारत बापू कोरके, श्री संजय कोरके, व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

